सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब/मासिक/विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज तात-१ ठ. क्र. २७५ / ३०६ दि. १९/११/९५ रोजी ठेवता आलेला प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-१/३०६

सोलापूर शहरातील पहिले एव्हरेस्टवीर आनंद बनसोडे यांना सध्या मणक्याचा विकार झालेला असून त्यांना यासाठी आर्थिक मदतीची अत्यंत आवश्यकता आहे.

तरी महानगरपालिकेचे वतीने त्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत त्यांचे औषधोपचारासाठी देण्यास आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८१ ठ. क्र. २४६
दि. १८/११/१५ रोजी ठेवता झालेला प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था व रस्ते विकास प्रकल्प मनपा हिस्साकरिता १३ व्या वित्त आयोग अनुदानावरील व्याज रक्कम वापर करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव आजला मा. शासनाकडून १३ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान रक्कमेवर आज अखेर र.रु. ६,७३,८६,७९६/- इतके व्याज १३ व्या वित्त आयोगाचे बँक ऑफ महाराष्ट्र मधील मनपाचे स्वतंत्र फ्लेक्झी खाते क्र. ६००६६२०३०२१ मध्ये जमा झालेली आहे.परंतू शासनाकडूनच १३ व्या वित्त आयोगाची अनुदानाची रक्कम मनपास उशिरा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यावेळी व्याज रक्कम शासनाकडून मनपास स्वतंत्रपणे उपलब्ध करुन देण्यात आले आहे. याबाबीचा विचार करता सध्या महानगरपालिकेस प्राप्त अनुदानावर बँकेकडून १३ व्या वित्त आयोगाचे खाते क्र. ३०२१ व्याज रक्कम रु. ६,७३,८६,७९६ इतकी जमा झालेली आहे. तरी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेकरिता १३ वे वित्त आयोग प्राप्त अनुदान रक्कमेवरील जमा झालेले व्याजाची रक्कम मनपा हिस्सा म्हणून महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योजनेकरिता सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था व रस्ते विकास प्रकल्प या दोन्ही योजनेकरिता वापर करणेसाठी योजनेच्या खात्यामध्ये वर्ग करणेस तसेच मा.मनपा सभेची मान्यता घेणेकामी मा.मनपा सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २०-१०-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणाचे अवलोकन केले.

मा. आयुक्त यांचे दि. २०-१०-१५ चे टिपणीतील १३ वे वित्त आयोग प्राप्त अनुदान रक्कमेवरील जमा झालेल्या व्याजाच्या रक्कमेपैकी सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्थे करिता ५० टक्के रक्कम व रस्ते विकास कामासाठी ५० टक्के रक्कम खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८८ ठ. क्र. २४८
दि. १९/११/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



हुतात्मा अब्दुल रसुल कुर्बान हुसेन यांच्या वारसदार यांची प्रस्तावात नमूद प्रमाणे थकलेली मानधनाची फरकाची रक्कम वारसदार यांना आदा करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव हुतात्मा अब्दुल रसूल कुर्बान हुसेन यांचे वारसदार श्रीमती मरियमबी शेख यांना आदा करणेत येत असलेली दरमहा र.रु. ३०००/- मानधनाची रक्कम मे. कोर्टाचे आदेशानुसार वारसदार म्हणून श्री. हकिमोद्दीन इस्माईल शेख यांना आदा करणेकामी धोरणात्मक निर्णय होणे जरुरीचे असल्याने याबाबत मा. मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १-११-१५ चे टिपणीने आलेले प्रकरणास मान्यता देण्यांत येत आहे. आणि हुतात्मा कुर्बान हुसेन यांचे वारसदार श्री. हकिमोद्दीन इस्माईल शेख यांना दरमहा र.रु. ३०००/- आदा करणेस धोरणात्मक मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २९३ ठ. क्र. २४८
दि. १९/११/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. २९३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलाकार समिती ही संस्था मा. धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास कार्यालय येथे सन २००३ मध्ये नोंदणीकृत असून (नोंदणी महा/१२८५७/२००३) सदर संस्थे अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी आंबेडकर पुतळयासमोर येथे प्रत्येक वर्षी भीमगायनाचा कार्यक्रम घेण्यात येतो. मागील २० ते २५ वर्षापासून भीमअनुयायी या कार्यक्रमाचा लाभ घेत असतात. यापूर्वी सदरचे कार्यक्रम खर्च पदाधिकारी यांनी स्वखर्चाने केले आहे. सदर कार्यक्रमासाठी परगावाहून येणारे कलावंत यांचे मानधन, जेवणखर्च, स्टेज, मंडप, स्पिकर, गाद्या, खुर्च्या, मॅट वाद्यासहीत वाद्यसाहित्य भाडे इतर खर्चासाठी र.रु. ५०,०००/- निधीची गरज आहे. तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कलाकार समिती शहर जिल्हा सोलापूर यांना उपरोक्त कार्यक्रमासाठी दरवर्षी र.रु. ५०,०००/- चे अनुदान देणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २९४ ठ. क्र. २४९
दि. १९/११/१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



लोकशाहीर कविराय रामजोशी यांचा पूर्णाकृती पुतळा हुतात्मा स्मृती मंदिर समोर बसविणेस व त्यासाठी येणा-या खर्चास धोरणात्मक मान्यता देणेत येत असून, पुतळा बसविणेसाठी मा. महाराष्ट्र शासन व गृह खात्याची घ्यावी लागणारी परवानगी घेण्यास मा. आयुक्तांना अधिकार देण्यात येत आहे. तसेच लोकशाहीर कविराय रामजोशी यांच्या नावे भव्य असे सभागृह सोलापूर शहरात मनपाच्या किंवा महाराष्ट्र शासनाच्या योग्य अशा जागेत बांधण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. २८९ ठ. क्र. २५०
दि. १०।११।१५ रोजी ठेवला खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



पायाभूत सोयी सुविधा निर्मिती करीता सोलापूर महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिलेल्या निधीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. १ अन्वये मा. शासनाकडून र.रु. ९.३५ कोटीची १ ते २५ कामे निश्चित करुन देणेत आलेली आहे. मनपा हिस्सा म्हणून १४ वे वित्त आयोग प्राप्त अनुदान रक्कमेतून ५० टक्के मनपा हिश्श्याची रक्कम जमा करणेबाबत प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ३ चे पत्रात नमूद केले आहे. सोलापूर महानगरपालिकेस १४ व्या वित्त आयोगाअंतर्गत र.रु. १७,६७,४२,६४३/- इतकी रक्कम अनुदान म्हणून प्राप्त झालेली असून, त्याची ५० टक्के म्हणजे र.रु. ८,८३,७१,३२१/- इतकी होत असून, उर्वरीत र.रु. ५१,२८,६७९/- इतकी रक्कम मनपा फंडातून जमा करावी लागणार आहे. अशी एकूण जमा होणा-या र.रु. ९.३५ कोटीची कामे निश्चित करुन त्रिसदस्यीय समितीची मान्यता घ्यावी लागणार आहे. तरी याबाबत प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. ३ चे पत्रानुसार कार्यवाही ठेवणेबाबत सादर केले असता अ बाबतची कार्यवाही मनपा फंडातून न करता १४ व्या वित्त आयोगाच्या पुढील टप्प्यातील अनुदानातून करणे योग्य ठरेल. तरी सदरचा प्रस्ताव मा.मनपा सभेकडे सादर करणेस मा. आयुक्त यांचे दि. १-११-१५ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मनपा हिस्सा म्हणून १४ व्या वित्त आयोग प्राप्त अनुदान रक्कमेतून ५० टक्के मनपा हिश्श्याची रक्कम याकरिता कामाची यादी करणेकामी मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. सभागृह नेता यांना अधिकार देणेत येत आहे. सदरच्या पूर्वगणनपत्रकास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २९५ ठ. क्र २५९
दि. १९/११/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला



श्री.राजशेखर बसप्पा कुदळे, वय वर्षे ५४, राहणार ९३३ उत्तर कसबा सोलापूर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची आहे. त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. श्री. राजशेखर कुदळे यांना हृदयविकार झाल्याने त्यांच्यावर दोनवेळा बायपास शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यांच्यावर अश्विनी सहकारी रुग्णालयात उपचार घेतला असून उपचारासाठी व त्यांना आवश्यक असणाऱ्या औषधोपचारासाठी अंदाजे र.रु.२,६०,०००/- इतका खर्च झाला आहे. कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही.तसेच त्यांना सध्या किडनीचा विकार झाल्याने त्यांच्यावर एक दिवसाआड डायलॅसिस करावे लागते. श्री.राजशेखर बसप्पा कुदळे यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांच्यावर आजारावर उपचार करण्यासाठी व औषधांसाठी महानगरपालिकेतर्फे जास्तीत जास्त आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज २९९ ठ. क्र. 252
दि. 9.9/99/95 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला. २९९

सोलापूर महानगरपालिकेचे वतीने सध्या जे नळ कनेक्शन रहिवाशांना देण्यांत येत आहेत. ते आयटीआयचे विद्यार्थी किंवा मक्तेदारांकडून देण्यांत येतात. परंतू त्याबाबत सविस्तर असे काहीच रेट ठरलेले नाहीत. उदा. घरगुती किंवा व्यावसायिक कनेक्शन देतेवेळी अर्धा इंची, पाऊण इंची, एक इंची याकरिता रनिंग फुटासाठी दर ठरविण्यांत यावा. व ते दर प्रमाणित करुन त्या फुटाप्रमाणे दराची आकारणी करण्यांत यावी. खोदकामाची खोदाई केली जाते ती चार इंची किंवा सहा इंची असते ती कमीत कमी दिड फुटापर्यंत खाली खोदकाम करुन पाईप घालण्यांत यावा. गेट वॉल्व्ह बसविणे अथवा टॅब मारणे याबाबतही दर ठरविण्यांत यावे आणि या ठरलेल्या दराचे जाहिर प्रसिध्दीकरण करुन सर्व नागरिकांना ते माहितीसाठी कळविण्यांत यावे. जेणेकरुन असे कनेक्शन घेतेवेळी नागरिकांकडून भरमसाठ आकारणी केली जाणार नाही यास मान्यता देणेतस्तव आलेला प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 300 ठ. क्र. 243
दि. १८/११/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.

३००

प्र.क्र. ३५ अ मधील मल्टी धट्टी सार्वजनिक शौचालय असून ते खूप जुने पुराणे असून बरीच पडझड झाल्याने त्याचा उपयोग त्या परिसरातील नागरिक क्वचीतच करतात. त्यामुळे तो संपूर्ण परिसर अस्वच्छ असून दुर्गंधीयुक्त आहे. त्यापासून रोगराई पसरत आहे. लोक आजारी पडत आहेत. तेव्हा सदरील जुने पुराणे सार्वजनिक शौचालय पाडून त्या ठिकाणी नविन सुलभ शौचालय बांधणे गरजेचे आहे. तसेच त्या सुलभ शौचालयावर समाज मंदिर बांधणे गरजेचे आहे. सदरील कामाचे प्लॅन व एस्टीमेट तयार करुन याकामी अंदाजे र.रु. ६०.०० लाख खर्च अपेक्षित असून तो येणारा खर्च हा दलित वस्ती सुधारणा योजनेमधून करणेस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

प्लॅन व एस्टीमेट करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~वहकुब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 309 ठ. क्र. 248
दि. 9/11/15 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

३०१

डॉ. आंबेडकर चौक मध्यवर्ती ठिकाण याठिकाणी गोलाईमध्ये सम्राट अशोकस्तंभ व घटनेची प्रस्तावना मंजूर असून, सदर कामाचे वर्कऑर्डर नगरअभियंता कार्यालयाकडून दिनांक १-२-२०१४ रोजी दिले असून, अद्यापपर्यंत वरील ठिकाणी काम चालू केलेले नाही. दिनांक २६ नोव्हेंबर हा ६६ वा संविधान दिन म्हणून ऐतिहासिक दिवस असल्यामुळे सदर दिवशी या कामाचे भूमीपूजन करुन प्रत्यक्षात कामास सुरुवात करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा. महापौर यांचे शुभहस्ते भूमीपूजन करुन कामास सुरुवात करण्यांत यावी.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज 302 ठ. क्र. 244
दि. 9/8/99/95 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

३०२

श्री. शेख तौफिक नईम रा. १०२ सी ७१ भवानी पेठ सोलापूर यांचे वडील श्री. नईम खाजामिन शेख हे दि. २४-७-२०१५ पासून गंगामाई हॉस्पीटल येथे उपचार घेत असून उपचारासाठी त्यांच्यावर झालेल्या आजपर्यंत र.रु. ७.०० लाख इतका मोठा खर्च झालेला आहे. त्यांची प्रकृती आजला ठिक आहे. त्यांना डिस्चार्ज घ्यावयाचा असून त्यांचे बिलाचे रक्कम दवाखान्यामध्ये भरल्यासच त्यांना डिस्चार्ज मिळणे शक्य आहे. याकरिता व त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने त्यांना महानगरपालिकेकडून र.रु. १.०० लाख इतकी मदत तातडीने देण्यास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३०५ ठ. क्र. २५६
दि. १९।११।९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

३०५

डॉ.प्रधान बंगला (महापौर निवास) ते सरस्वती चौक या रस्त्यास **कै.डॉ.एम.जी.प्रधान रस्ता** असे नांव देणेस आणि डॉ. उमा प्रधान नेत्र रुग्णालयाजवळील चौकास **डॉ.एम.जी.प्रधान चौक** असे नाव देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीने निर्णय घेण्यांस मान्यता देणेत येत आहे.

~~नगर~~ सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मासिक/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. 304 ठ. क्र. 256
दि. 9/11/95 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



कै. कोंडीबा बापू भास्कर, हे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व गवळी समाजाचे ज्येष्ठ नेते होते. त्यांचे सामाजिक, शैक्षणिक व रोजगार विषयक कामामुळे अनेकांना याचा लाभ झालेला आहे. तसेच त्यांचे अध्यात्मिक क्षेत्रातील काम अतिशय उल्लेखनिय होते. त्यांचे मनमिळावू व सहकार्याची वृत्ती यामुळे त्यांची शुक्रवार पेठ या भागात मोठी ख्याती होती. अशा धुरंदर व्यक्तीमत्वाचे चिरंतन स्मरण राहण्यासाठी शुक्रवार पेठ येथील कालिका मंदिर समोरील चौकास **कै. कोंडीबा बापू भास्कर चौक** असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिधान समितीने निर्णय घेण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या ~~तहकूब~~/मामुली/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ३०३ ठ. क्र. २५८
दि. ९.११.१५ ... राजा ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



सोलापूर शहर सिटी सर्व्हे नं. ७१०७ (भाग) आरक्षण क्र.७/१३ ह्या ठिकाणी आरक्षण जागेतील बदलाबाबतचे ठराव सोलापूर महानगरपालिका सभा ठराव क्र. ३३४ दि.०८/१२/२०११ रोजी ठराव केला असून, त्याप्रमाणे प्रसिध्दीकरण करुन आलेल्या सूचना हरकती मागविण्यात आल्या, सूचना हरकती प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करणे आवश्यक होते तशी कार्यवाही करण्यात आली नसल्याने मनपा ठराव क्र.३३४ दि.०८/१२/२०११ रोजी केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी मा.शासनाकडे पाठविण्यास मान्यता देणेत येत असून या संदर्भामध्ये मा.आयुक्तांनी तातडीने पुढील कार्यवाही करावी यासही मान्यता देणेत येत आहे.

त्याचप्रमाणे (१९९७-२०१७) मंजूर विकास आराखडयामध्ये विविध ठिकाणी बसडेपोसाठी जागेचे आरक्षण ठेवलेले ती आरक्षित जागा ताब्यात घेण्यासाठी आयुक्तांनी त्वरीत विनाविलंब कार्यवाही करावी यांस मान्यता देणेस्तव आलेला प्रस्तावास मान्यता देण्यांत येत आहे.

नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका